शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

||| विद्याधनं सर्वधन् प्रधानम् |||

दि. महाराष्ट्र एज्युकेशन अॅन्ड स्पोर्टस् अकॅडमी चंदगड

# महादेवराव बी.एड्. कॉलेज, तुर्केवाडी
# ता. चंदगड, जि. कोल्हापूर
# सन 2024 -2025
# Best Practices

# “गांडूळ खत निर्मिती करणे आणि त्याबाबत जनजागृती उपक्रम ”



# अहवाल लेखन

# उपक्रमाचे नाव : गांडूळ खत निर्मिती करणे आणि त्याबाबत जनजागृती उपक्रम

## प्रास्ताविक

भारत हा एक कृषिप्रधान देश आहे. देशाच्या वाढत्या लोकसंख्येच्या अन्नधान्याची पूर्तता करण्याची जबाबदारी शेतीवर आहे. त्यामुळे या शेतीला उत्पादन वाढवणे गरजेचे आहे. शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी शेतकऱ्याला शेतामध्ये विविध खतांचा वापर करावा लागतो.आज शेतीमध्ये वेगवेगळ्या रासायनिक खतांचा वापर केला जात आहे. रासायनिक खताच्या वापरामुळे शेतजमिनींची सुपीकता कमी होत आहे.त्यामुळे रासायनिक खताला पर्याय म्हणून सेंद्रिय खतांचा वापर केला पाहिजे.सेंद्रिय खतांचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. त्यामध्ये कंपोस्टखत , शेणखत, जिवाणू खत, गांडूळ खत अशी काही खते सांगता येतील. शाश्वत शेतीच्या विकासासाठी सेंद्रिय खतांचा वापर करणे आज काळाची गरज बनलेली आहे. आपल्या परिसरातील शेतकऱ्यांना यावाबत जागृत करणे खूप गरजेचे आहे. म्हणून बी. एड. भाग दोनच्या प्रशिक्षणार्थीनींकडून यापैकी गांडूळ खत निर्मितीचा प्रकल्प राबविण्याचा समाजाभिमुख उपक्रम महाविद्यालयाने हाती घेतला. यामध्ये महाविद्यालयामध्ये गांडूळ खताची निर्मिती करणे आणि त्याबाबत जनजागृती करणे या प्रमुख उद्देशाने हा प्रकल्प तीन महिन्याच्या कालावधीमध्ये राबविण्यात आला आहे.

## कार्यक्रमाची उद्दिष्टे :-

- बी. एड. प्रशिक्षणार्थींना गांडूळ खत निर्मितीची माहिती देणेस मदत करणे.
- बी. एड. प्रशिक्षणार्थींना गांडूळ खत निर्मिती प्रकल्पांना भेटी देऊन खत निर्मितीची प्रक्रिया समजावून घेणेस साहाय्य करणे.
- बी. एड. प्रशिक्षणार्थींकडून महाविद्यालयात गांडूळ खत निर्मिती प्रकल्प राबवीणे.
- बी. एड. प्रशिक्षणार्थींना गांडूळ खत वापराबाबत जनजागृती करण्यास प्रोत्साहन देणे.

## उपक्रमाची कार्यवाही

महादेवराव बी. एड. कॉलेज तुर्केवाडी येथील प्रशिक्षणार्थीनी गांडूळ खताची निर्मिती करणे व जनजागृती करणे हा प्रकल्प दिनांक 16 डिसेंबर 2024 ते २० मार्च 2025 या कालावधी दरम्यान महाविद्यालयात राबवण्यात आला.

सदर प्रकल्प बी. एड. कॉलेजचे प्रभारी प्राचार्य श्री. एन. जे. कांबळे व सर्व प्राध्यापक वृंद यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आला. हा प्रकल्प राबवण्यासाठी प्रकल्पाबाबत चंदगड तालुक्याचे कृषी अधिकारी माननीय श्री. विजय गंबरे यांची भेट घेऊन त्यांच्याकडून या प्रकल्पाविषयी शासकीय अनुदान तसेच इतर बाबी जाणून घेतल्या. यानंतर सदर प्रकल्प कशा पद्धतीने उभा करायचा याविषयी जाणून घेण्यासाठी शिवणगे येथील मा. श्री.दयानंद सलाम यांच्या गांडूळ खत निर्मिती प्रकल्पाला प्रत्यक्ष भेट दि.17/१२/२०२४ रोजी देऊन माहितीचे संकलन केले. संकलित केलेल्या माहितीच्या आधारे महाविद्यालयांमध्ये गांडूळ खत निर्मिती उपक्रम राबवण्यात आला.

या प्रकल्पासाठी प्रशिक्षणार्थींनी महाविद्यालयामधील योग्य अशा जागेची निवड करून ती जागा स्वच्छ करून गांडूळ बेडसाठी जागा तयार केली. तसेच बेडसाठी शेडची उभारणी केली.

प्रकल्पासाठी आवश्यक अशा सर्व साहित्य जमा करून बेड तयार करण्यात आला. यामध्ये शेणखत, नारळाचा काथ्या , उसाचे पाचट , गांडूळ हे साहित्य आवश्यक प्रमाणात एकत्र करण्यात आले. सर्वप्रथम 40 दिवसाचे जुने शेणखत आणले. त्यावर ५ दिवस पाणी मारण्यात आले. तयार बेडमध्ये नारळाचा काथ्या, उसाचे पाचट तळाशी टाकून त्यामध्ये हवेसाठी पाईप जोडण्यात आला. ५ दिवसानंतर शेणखत बेडमध्ये टाकण्यात आले.

पाच दिवस शेणखतावर पाणी मारून झाल्यानंतर शिवनगे व माडवळे येथील गांडूळ निर्मिती प्रकल्पातून गांडूळ आणून बेडमध्ये सोडण्यात आले.

त्यानंतर दररोज किमान 15 लिटर पाणी टाकण्यात आले.ही प्रक्रिया दररोज खत तयार होईपर्यंत करण्यात आली. जे व्हर्मिवॉश जमा होत होते ते पुन्हा बेडमध्येच पुन्हा टाकण्यात आले. साधारणत: २ महिन्याच्या कालावधीमध्ये गांडूळ खत तयार झाले.

सदर गांडूळ खताची प्रकल्पाचे निर्मिती आणि त्याचे शेतीसाठी असणारी उपयुक्तता याबाबत तुर्केवाडी व वैताकवाडी येथील शेतकऱ्यांना बोलवून त्यांना गांडूळ खत निर्मितीबाबत माहिती देण्यात आली. गांडूळ खत निर्मिती आपल्याकडे उपलब्ध असणाऱ्या साहित्यामध्ये करता येते व शेतीतून अधिक उत्पादन घेता येते याची सविस्तर माहिती त्यांना देणेत आली. पर्यावरण पूरक गांडूळ खताचे शाश्वत शेतीसाठीचे महत्व याबाबत सर्वांना उद्बोधन करण्यात आले.

## ❖ <u>गांडूळ खत कार्य पद्धती वेळापत्रक:</u>

| अ. क्र. | घटक | दिनांक |
|---|---|---|
| १ | तालुका कृषी अधिकारी भेट | १६/१२/२०२४ |
| २ | गांडूळ खत प्रकल्पाला भेट | १७/१२/२०२४ |
| ३ | जागेची पाहणी व आखणी | १८/१२/२०२४ |
| ४ | जागा तयार करणे | २१/१२/२०२४ |
| ५ | शेड उभारणे | २८/१२/२०२४ |
| ६ | बेड तयार करणे | ०२/०१/२०२५ |
| ७ | बेडमध्ये गांडूळ सोडणे | १०/०१/२०२५ |
| ८ | बेडवर नियमित पाणी मारणे व बेडची निगा राखणे | १०/०१/२०२५-१५/०२/२०२५ |
| ९ | खत गोळा करणे | |
| १० | जन जागृती करणे | |

**गांडूळ खत निर्मितीसाठी आवश्यक साहित्य:**

## साहित्य :-

- प्लास्टिक बेड- ८*४ फूट
- शेणखत–(४५ दिवस जुने)- ७०० किलोग्राम
- नारळाचा काथ्या
- पालापाचोळा, उसाचं पाचट
- प्लास्टिक PVC पाइप - ८फूट ते १० फूट.
- Green कापड,
- लहान बॅरल/ प्लास्टिक बादली-वर्मीवॉशसाठी
- शेडसाठी- पत्रे, लाकडी खांब, दोन बांबू मोठे, मोळे, तार, कुदळ, फावडे, पाणी मारण्याची बादली
- गांडूळ - २-३ किलोग्राम
- माती
- वीटा– १२
- बांबू –२
- पोती –८
- किटकनाशक पावडर
- चाळणी (खत चाळण्यासाठी)

### उपक्रमासाठी खर्च:-

| **अ. क्र.** | **तपशील** | **खर्च** |
|---|---|---|
| 01 | प्लास्टिक बेड- ८*४फूट | रु १५००/- |
| 02 | शेणखत | रु १००० |
| 03 | Green कापड | रु २०० |
| 04 | गांडूळ २-३ किलोग्राम | रु ३०० |
| 05 | किटकनाशक पावडर | रु -५० |
| **एकूण खर्च** | | **रु ३०५०** |

**अपेक्षित खत निर्मिती – ५०० किलोग्राम**

## समारोप

सदर उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. महादेवराव वांद्रे यांचे प्रोत्साहन मिळाले. तसेच हा उपक्रम राबवण्यासाठी प्रा. श्री एन. जे. कांबळे, प्रा.श्री. ग गो.प्रधान. प्रा. श्री. एम.आर. मुल्ला व प्रा. श्री. वाय. पी. पाटील  यांचे मार्गदर्शन लाभले.तालुका कृषी अधिकारी श्री. विजय गंबरे व गांडूळ खत प्रकल्पक श्री. दयानंद सलाम व माडवळे येथील प्रकल्पक श्री. नितीन सुभेदार  यांचे मोलाचे मार्गदर्शन व साहाय्य लाभले.



तालुका कृषी अधिकारी श्री. विजय गंबरे यांच्याकडून माहिती घेताना



गांडूळ खत प्रकल्प शिवनगे येथे प्रत्यक्ष भेट देऊन माहिती घेताना बी. एड. प्रशिक्षणार्थी

जागेची आखणी करताना








बेड तयार करताना प्रशिक्षणार्थी




शेणखत भरताना प्रशिक्षणार्थी



गांडूळ सोडताना








जमा झालेले व्हर्मीवाश

